'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Vol.-VIII, Issue-II
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April-June 2021

# ग्रामीण साहित्यात प्रवाह निर्माण होण्याची कारण परंपरा

प्रा.डॉ.अरूण पाटील
मराठी विभाग प्रमुख
महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय, मालेगोंव कॅम्प जि. नाशिक

१९४७ साली भारत स्वतंत्र झाला. स्वातंत्र्यापूर्वीच्या समस्यांनी रुपांतर केले. इंग्रजांशी लढण्याचे कारण उरले नाही. साहित्याचा मार्ग काहीसा बदलला. ग्रामीण भाग सुधारणाकडे वाटचाल करु लागला. काही दशके उलटली आणि १ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली. महाराष्ट्र राज्याची निर्मिती ही एक अनन्यसाधारण घटना बनली. स्वतंत्र महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून 'यशवंतराव चव्हाण' यांची निवड करण्यात आली. या राजकीय घडामोडीनंतर यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली अनेक सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक घडामोडी झाल्या. त्यांचे स्पष्ट आणि दुरगामी-परिणाम साहित्यावर खास करुन 'ग्रामीण साहित्यावर' झाले. काळाची पाउले ओलांडून स्वातंत्र्यानंतर पंचवार्षिक योजनेची स्थापना झाली. त्याचेही पडसाद साहित्यावर उमटले. शिक्षणाची गंगा वाडी, वस्त्यांवर आली. खेड्यापाड्यापर्यंत पोचली. यशवंतराव चव्हाण यांच्या दूरदृष्टीने महाराष्ट्र विकासाकडे जोमाने पाऊल टाकू लागला. शैक्षणिकदृष्ट्या सुदृढ होऊ लागला. बहुजन समाजाची शैक्षणिक भूक वाढू लागली. सर्वसामान्यांना देखील वैचारिक भान येऊ लागले. या साऱ्या गोष्टी देखील साहित्यावर परिणाम करणाऱ्या ठरल्या. एव्हाना ग्रामीण साहित्यिकांची दुसरी पिढी आणि तिसरी पिढी देखील कार्यरत झाली. मळलेली वाट सोडून या नव्या पिढ्यांनी आपले साहित्य वेगळ्या पद्धतीने आणि वर्तमानाला अनुसरुन लिहिण्याचे महत्त्वाचे कार्य केलेले दिसते.

या संदर्भात अभ्यासक वासुदेव मुलाटे म्हणतात, "स्वातंत्र्योत्तर काळात एकूण साहित्यामध्येच काही परिवर्तने आली. साहित्याकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला. मराठी साहित्याच्या संदर्भात जरी बघायचे झाले तरी ही बाब लक्षात येण्यासारखी आहे. विशेषत: स्वातंत्र्यानंतरच्या १५-२० वर्षांच्या काळात मराठी साहित्यात काही नवीन प्रवाह निर्माण झाले आणि हे सर्व एकाएकी घडले नाही. या नवीन प्रवाहांच्या पाठीमागे काही एक वैचारिक बैठक आहे. ही वैचारिक बैठक त्या-त्या सामाजिक चळवळीतून त्यांना प्राप्त झालेली आहे."[१]

साहित्याचा हा प्रवाह कालानुरुप पुढे सरकत असताना विविध प्रकारची स्थित्यंतरे झालेली आपणास दिसतात. समाज घडत राहतो. ज्या विविध क्षेत्रात आपल्याला स्थित्यंतरे झाली त्याचा आढावा पुढीलप्रमाणे-

**१) राजकीय स्थित्यंतर -**

स्वतंत्र महाराष्ट्राची स्थापना होण्यापूर्वीपासूनच राजकीय स्थित्यंतराची अवस्था सुरु झालेली आपल्याला दिसते. १९४८ साली महात्मा गांधी यांची हत्या झाल्यानंतर ब्राह्मण वर्गाविरुद्ध या घटनेचे जोरदार पडसाद उमटले. उच्चवर्णीयाची मक्तेदारी संपविण्याचे काम सर्वसामान्यांनी हातात घेतले. 'ब्राह्मण समाज' राजकारणापासून दूर गेला. राजकारण केल्यास सामाजिक समस्या सुटू शकतील असा विश्वास बहुजन समाजाला वाटू लागला. त्यातून राजकारणाची सूत्रे बहुजन समाजाच्या हाती दिली. गाव पातळीवरुन शहरापर्यंत बहुजन समाजाने आगेकूच केली.

१९६० एकोणीसशे साठमध्ये मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचा दूरदृष्टीपणा या साऱ्या घडामोडीमध्ये जाणवत राहिला. हळूहळू राजकारण बदलत गेले. राखीव जागांचे प्रश्न निर्माण होऊन मागील ७० वर्षामध्ये राजकारणाने खूप मोठे स्थित्यंतर स्वीकारले.

**२)औद्योगिक स्थित्यंतर :-**

१९५१ पासून भारतीय आर्थिक नियोजनास प्रारंभ झाला. कृषीप्रधान देश म्हणून भारताकडे बघितले जात असल्याने पहिली पंचवार्षिक योजना शेती विकासास प्राधान्य देणारी होती. त्यामुळे कृषी क्षेत्रात हरित क्रांती झाली. शेतीपुरक व्यवसायाचा विकास झाला.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत औद्योगिक विकासास प्राधान्य देण्यात आले. या कालखंडात महाराष्ट्रात साखर कारखान्यांची निर्मिती मोठ्या प्रमाणावर झाली. १९६० पर्यंत महाराष्ट्राला १४ साखर कारखाने होते. त्याची संख्या १९७० पर्यंत ३० एवढी झाली. साखर कारखाने हे ग्रमीण भागात अनेक सुधारणा झाल्या. लोकांच्या हाती पैसे

E-ISSN : 2348-7143
April-June 2021

खुळखुळू लागले. शाळा, वैद्यकीय महाविद्यालय, अभियांत्रिकी महाविद्यालय यासारख्या शैक्षणिक संस्था स्थापन झाल्या. पशुपालन, कुकुटपालन, दुग्ध व्यवसाय यासारखे जोडधंदे मोठ्या प्रमाणावर निर्माण झाले. त्यासोबतच 'मुंबई कापड गिरण्यांची निर्मिती' झाली. शहराच्या जवळ औद्योगिक वसाहती स्थापन करण्यात आल्या. मोठ मोठे कारखाने महाराष्ट्राच्या विविध भागात काढण्यात आले. ग्रामीण भागातला तरुण रोख पगाराच्या आमीषाने या कारखान्याकडे आत्कृष्ट झाला.

३) **शैक्षणिक स्थित्यंतर :-**

स्वातंत्र्यापूर्वी शिक्षण हे केवळ उच्चवर्णीयाच्याच हाती असल्याने त्याचा प्रचार आणि प्रसार कमी प्रमाणात झाला. परंतु त्यानंतर प्राथमिक शिक्षण, दुय्यम शिक्षण व महाविद्यालयीन शिक्षण अशी शिक्षण व्यवस्था इंग्रजांनी घालून दिली त्याच काळात चिपळूणकर टिळक, आगरकर यांनी समांतरपणे महाराष्ट्राला शिक्षण संस्था स्थापन केल्या. स्वातंत्र्याआधी आणि स्वातंत्र्यानंतर जी काही आंदोलने येथे झाली या आंदोलनाला शैक्षणिक पुढारलेल्या लोकाचे अधिष्ठान असल्यामुळे त्यामुळे शिक्षणांचे महत्त्व अधोरेखीत झाले. महाराष्ट्र शिक्षणाच्या बाबतीत भाग्यशाली म्हटला पाहिजे. येथे कमी कालखंडात शैक्षणिक क्रांती घडून यशवंतराव चव्हाण यांनी आर्थिकदृष्ट्या दुर्बळ असणाऱ्यांसाठी मोफत शिक्षणाची योजना सुरु केली. शिक्षण हे ग्रामीण भागापर्यंत पोहचले पाहिजे हे त्यांनी ओळखले. त्यामुळे शासकीय पातळीमधील सर्व योजना खेड्यापर्यंत येऊ शकल्या. शिक्षण खेड्यापर्यंत आले. बहुजन समाजातील मुले शिकू लागली, विचार करु लागली, त्यांच्या इच्छा-आकांक्षा आणि जीवनशैली बदलू लागली. या तरुणांचे अभ्यासाचे विषय वेगवेगळे ठरु लागले. जातीसंस्था, कुटुंब संस्था, अस्पृश्यता, मध्यमवर्ग, मजूरवर्ग, मराठी संस्कृती, लोकसंस्कृती लोक वाङ्मय अनेक विषय या शैक्षणिक स्थित्यंतराच्या कालखंडात अभ्यासले गेले.

४) **धार्मिक स्थित्यंतर :**

भारतामध्ये अठरापगड जाती आणि अनेक धर्म शतकानुशतके अस्तित्वात आहेत. त्याच पार्श्वभूमीवर सर्वधर्मसमभाव ही संकल्पना मांडण्यात आली आहे. हिंदू, मुस्लीम, शीख, ईसाई, जैन, पारशी असे अनेकधर्मिय लोक याठिकाणी एकत्र राहत असले तरी प्रत्येक दीन धर्मियामधील अंतर जाणण्याइतपत आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात महाराष्ट्रात तळागाळातील दलित समाज आणि दलितेतर उच्चवर्णीय लोक यामधील अंतर खूप मोठे होते. स्पृश्य-अस्पृश्यता जातीय भेदभाव यातून निर्माण झालेली दरी अन्यायकारक ठरली होती. दलितांना हिनत्वाची वागणूक मिळत होती. शैक्षणिक प्रगतीला दलित मुकले होते. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र या चातुवर्ण्यव्यवस्थेतून 'आलुतेदार' आणि 'बलुतेदार' अशी कामाची विभागणी झाली. या विभागणीचे परिणाम ही जातीव्यवस्था अधिक मजबूत करणारे ठरले परंतु कालचक्रामध्ये यातील अन्यायविषयक तीव्रपणाही समोर आला आणि समाजन्यायाची मागणी जोर धरु लागली. दलितांना मिळणारी हीन वागणूक पाहून व्यथित झालेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धर्म स्विकारला. त्याच्यासमवेत त्यांचे लाखो अनुयायी होते. त्यांच्या आधी महात्मा फुले यांनी जातियतेच्या विरोधात रान उठविले. नंतरच्या काळात छत्रपती शाहू महाराजांनी सर्वांना समान वागणूक मिळण्यासाठी प्रयत्न केले. या सगळ्या चळवळीमधून काही अत्यंत चांगल्या गोष्टी समोर आल्या. शिक्षणाचा प्रसार, वैचारिक जडणघडण, औद्योगिक विकास, अस्पृश्यता निवारण संबंधीचे कायदे या त्या गोष्टी सांगता येतील. खेड्यातले लोक शहराकडे वळू लागले. उद्योग व्यवसायाच्या आणि नोकरीच्या निमित्ताने एकत्रित राहू लागले. हळूहळू जातीव्यवस्थेतील अनिष्ठ रुढी परंपरा संपू लागल्या. शासन स्थरावर, राखीव जागा, दीन-दलितासाठी उपलब्ध करुन देण्यात आल्या. त्यामुळे उच्चवर्णियाची मक्तेदारी संपून सर्वांना समान न्याय मिळणे शक्य झाले.

५) **शेतीविषयक स्थित्यंतर :-**

भारताच्या पहिल्या आणि दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत शेतीविकासास प्राधान्य देण्यात आले. येथील ७०% जनता ही आपला उदरनिर्वाह शेती व्यवसाय स्विकारुन करीत असल्याने 'भारताला कृषीप्रधान देश म्हटले गेले. पंचवार्षिक योजनांच्या अंमलबजावणीमुळे येथे हरीत क्रांती झाली. पंजाबला धान्याचे कोठार म्हणवले जाऊ लागले. शेतीमध्ये यांत्रिकीकरण आले. कमाल जमीन कायद्याअंतर्गत शेतीचे वाटप शेतमजुरांना देखील करण्यात आले.

आधुनिक तंत्रज्ञान आणि ठिकठिकाणी नद्यांवर बांधण्यात आलेली धरणे यामुळे शेतीचा विकास झपाट्याने झाला. बियाण्याच्या अनेक सुधारित जाती निर्माण झाल्याने उत्पादन वाढले. शेतकऱ्याच्या हिताच्या अनेक योजना सरकारने स्थापन केल्या. असे असले तरी याचे काही दुष्परिणाम समोर आले. जमिनीच्या क्षमतेपेक्षा अधिक उत्पादन वारंवार घेण्याने जमीन नापीक झाली. सरकारी योजनाचा फायदा गरीब शेतकऱ्यांऐवजी श्रीमंतानीच उचलला, छोटा शेतकरी अस्मानी आणि सुलतानी संकटामुळे आत्महत्या करु लागला.

### ६) सांस्कृतिक स्थित्यंतर :

लोकप्रबोधनासाठी मराठी भूमीवरच्या संतांनी मोठ्या प्रमाणात 'लोकसाहित्य' लिहिले. यातून लोककलांची एक परंपराच येथे निर्माण झाली. वासुदेव, भारुड, गोंधळ, गौळण यासारख्या 'लोककला' संतांनी लिहिलेल्या वाङ्मयावर बहरल्या. त्याचा धागा पकडून इतर लोक साहित्यिकांनी 'लावण्या, पोवाडे, तमाशा, वाघ्या मुरळी, भोवाडा यासारखे लोककलेचे प्रकार निर्माण केले. महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा संतांच्या आणि लोकसाहित्यिकाच्या वाङ्मयावर बहरली. छत्रपती शिवरायाच्या कालखंडापासून ते थेट स्वातंत्र्य मिळेपर्यंत या संस्कृतीचे नंतरच्या काळात मराठी लोककला जतन करणे अवघड होऊन बसले. १९५३ मध्ये केंद्र सरकारने संगीत नाटक अकादमी स्थापन केली. तिच्यामार्फत देशभरातील लोकांना उत्तेजन देण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. त्यासोबतच 'गाव तेथे वाचनालय' अशी योजनाही निर्माण करण्यात आली. लोकांनी वाचावे व ज्ञानसमृद्ध व्हावे असा 'उद्देश' या पाठीशी होता. परंतु समाजाच्या आवडी बदलल्या, सकस कला आणि साहित्य याकडे समाजाने पाठ फिरवून 'हिणकस' असे सारे स्वीकारले.

### ७) सामाजिक स्थित्यंतर :-

वरील सर्व स्थित्यंतराचा परिणाम यथाअवकाश समाजावर पडलेला दिसतो. प्रत्येक माणूस समाजाचा घटक असतो. त्याची प्रत्येक कृती सामाजिक बदलाची नांदी ठरु शकते. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात झालेले विविध क्षेत्रातील बदल समाजाची जीवनशैली आणि राहणीमान बदलणारे ठरले. सर्व स्थित्यंतराचा परिणाम खेड्यावर झाला. खेड्यामधील एकदम खेड्यावर बदलले. गांधी हत्येनंतर खेड्यामधील जातीयता वाढली. खेड्यातला माणूस शहराकडे धाव घेऊ लागला. शिक्षणाच्या संधी सर्वांना उपलब्ध होऊ लागल्या. यातून बहूजन समाजाची वैचारिक जडणघडण होऊ लागली. औद्योगिकरणाचे वारे वाहू लागल्याने वीज, रस्ते, दळणवळणाच्या आधुनिक सोयी यामुळे संपूर्ण देश एकमेकांशी जोडला गेला. शहरात नोकऱ्या मिळू लागल्या. लोकांचा शेतीतील रस कमी झाला. हातात मोठ्या प्रमाणात पैसे पडू लागल्याने समाज व्यसनाधिनतेकडे चालू लागाला. शहरात गेलेले तरुण व शेतीसाठी खेड्यातच थांबलेले उर्वरीत कुटुंबिय यांच्यात अंतर पडू लागले. खेड्यात राहिलेल्या स्त्रियांना एक प्रकारच्या न्यूनगंडाने वेढले. शहरामध्ये गेलेले लोक शहरात परतण्यास नकार देऊ लागले. शहरी जीवनाचे त्यांना आकर्षण वाटू लागले. कनिष्ठ सामाजिक श्रेणीतून वरच्या श्रेणीत जाण्यासाठी त्यांची धडपड सुरु झाली. औद्योगिक क्षेत्रात गर्दी झाल्याने तेथे नव्याने प्रश्न निर्माण होऊ लागले. समाजामध्ये एक विचित्र तगमग तयार झाली. यातून अनेकांच्या मनात वैफल्य निर्माण झाले. शिक्षणाच्या प्रचार प्रसाराने वैचारिक सामर्थ्य वाढले. हक्काची जाणीव झाली. प्रादेशिक समस्या लक्षात येऊ लागल्या. आधुनिकता जीवन शैलीचा भाग बनू लागली. असे बरेच काही चांगले परिणाम दिसत असले तरी काही दुष्परिणाम यातून समोर आले. खेड्याची स्थिरता भंगली. एकत्र कुटुंबपद्धती लयास गेली. थोरा-मोठ्यांच्या मानअपमानाच्या संकल्पना पायदळी तुडवल्या जाऊ लागल्या. खेडे स्वयंपूर्ण राहिले नाहीत. शहरात लोकसंख्येची घनता वाढली.

या संदर्भात अभ्यासक वासुदेव मुलाटे म्हणतात, "या स्थित्यंतराचा परिणाम साहित्यावरही झाला. खेडे, खेड्याचा परिसर, निसर्ग यांचे दर्शन घडवून नाविन्याचा प्रत्यय देत वाचकाची कुतूहल जागविणारा एक लेखक वर्ग निर्माण झाला. तर दुसऱ्या लेखक वर्गाने ग्रामीण जीवनासंबंधाने काही अंदाज बांधले, समस्या निश्चित केली आणि तेथील ग्रामजीवन, निसर्गरम्य वातावरण, लेखक मनाला जागवणाऱ्या समस्या कशा सोडवता येतील याचे अंदाज बांधून लेखन करावयास प्रारंभ केला."[२]

श्री.म.माटे यांच्या 'तारळखोऱ्यातील पिऱ्या' आणि व्यंकटेश माडगुळकर यांच्या 'धर्मा रामोशी' या दोघांची तुलना ज्यावेळी आपण करतो त्यावेळी एका विलक्षणाच्या दु:खाची जाणिव आपल्याला होते. उद्धव शेळके यांची 'धग', रा.रं.बोराडे यांची 'पाचोळा' ही कादंबरी आपल्याला ग्रामीण साहित्याच्या अंतरंगात घेऊन जाते. द.मा.मिरासदारांच्या कथेमधील अस्सल ग्रामीण बेरकी माणूस एकीकडे दिसतो तर शंकर पाटलांच्या कथात ग्रामीण जीवनातील विविध कंगोरे दिसतात. विविध क्षेत्रात झालेली स्थित्यंतरे साहित्याचा रंग आणि पोत बदलणारी ठरली. शेतीतले प्रश्न संपवून पैसा आल्याने बिघडलेला समाज दिसू लागला. औद्योगिकीकरणामुळे ग्रामीण भागातील लोक शहराकडे जाऊन वेगवेगळ्या समस्यांमध्ये अडकले. धरण निर्मितीमुळे जमीन पाण्याखाली जाऊन झालेल्या ससेहोलपटीचे चित्रण विश्वास पाटील यांच्या 'झाडाझडती' सारख्या कादंबरीमध्ये दिसू लागले. खेड्यातला आणि शहरातला दुरावा वाढीस लागल्याने शेतकऱ्यावर आत्महत्येची वेळ येऊ लागली. त्यांचे चित्रण इंद्रजित भालेराव यांच्या कवितेतून दिसू लागले. उत्तम कांबळे यांच्यासारखा पत्रकार शेतकऱ्यांचा प्रश्नांचा अभ्यास करु लागला. कथा, कादंबऱ्या आणि कविता याचा बाज बदलून त्यामध्ये ग्रामीण व नागरी संस्कृतीचे एकत्रिकीकरण झाल्याचे दिसू लागले. पीएच.डी.चे विषय किंवा शोधनिबंध यामध्ये ही ग्रामीण साहित्य अंतर्भूत झाले. संस्कृतीचे वारकरी संस्कृती जपण्यासाठी म्हणून साहित्याचे माध्यम हाताळू लागले. वासुदेव पुस्तकात आला. गोंधळी संदर्भ ग्रंथात छापू लागला. तमाशाची लावणी चित्रपट संगीताच्या चालीवर ऐकू येऊ लागली. तमाशाचा ऑर्केस्ट्रा केव्हा झाला हेही समजले नाही. हे सारे चित्रण ग्रामीण साहित्यात मोठ्या प्रमाणावर आलेले दिसते. साखर कारखान्याच्या परिसरात साखर शाळा निर्माण झाल्या. त्यातून साखर कामगाराच्या मुलांच्या समस्या साहित्यात उतरल्या. असे सारे विषय या स्थित्यंतरातून ग्रामीण सहित्यामध्ये आपल्याला आलेले दिसतात.

**ग्रामीण साहित्य आणि सामाजिक व सांस्कृतिक चळवळी :-**

ग्रामीण साहित्याच्या कालखंडाचा विचार करावयाचा झाला तर १९२० पासून ग्रामीण साहित्य निर्मितीस प्रारंभ झाला. अगदी सुरवातीच्या काळात ग्रामीण साहित्यावर गांधी विचारसरणीचा प्रभाव पडलेला दिसतो. नंतरच्या काळात मात्र हळूहळू या साहित्यात वास्तववाद आलेला आहे. साधारणपणे ग्रामीण साहित्यामध्ये पहिली दुसरी पिढी संपता संपता १९७७च्या सुमारास ग्रामीण साहित्य चळवळीस प्रारंभ झालेला दिसतो.

या संदर्भात अभ्यासक प्रल्हाद लुलेकर म्हणतात, ''ग्राम'' हे एकंदर भारतीय संस्कृतीचे आदिपीठ आहे. त्या संस्कृतीच्या व्यक्तीमत्त्वाचे अनन्य साधारण सर्वसमावेशी रुप आहे. हे जीवन लोकसमुहातून निर्माण झालेल्या संकेतांवर रुढी-परंपरांनी बद्ध झालेले आहे. तेथील रीती, संस्कृती यामुळे जे जीवन घडले त्याबरोबरच नव्या जाणिवांना नवे उन्मेष फुटले.''[३]

संपूर्ण महाराष्ट्रात ठिकठिकाणी निर्माण होणारे साहित्य आणि साहित्यिक यांच्यामध्ये एकसूत्रीपणा यावा या उद्देशाने डॉ.आनंद यादव यांनी पुणे येथे पहिले ग्रामीण साहित्य संमेलन आयोजित केले. नदीच्या प्रवाहाला अडसर निर्माण व्हावा आणि तो अडसर कोणीतरी दूर करावा तसेच काहीसे ग्रामीण साहित्याच्या बाबतीत या पहिल्या संमेलनाने झाले. त्यानंतर आजपर्यंत संबंध महाराष्ट्रात असंख्य ग्रामीण साहित्य संमेलन ठिकठिकाणी भरविण्यात आली. यातून एक अत्यंत ताकदवान अशी चळवळ ग्रामीण साहित्याच्या दृष्टीने उभी राहिली. या दृष्टीने वासुदेव मुलाटे यांचे मत लक्षात घेण्यासारखे आहे. ते म्हणतात,

''आपला देश हा खऱ्या अर्थाने खेड्यांचा देश आहे. कृषीकेंद्रित खेड्यातील माणसांची मानसिकता इतर जनांपेक्षा वेगळी असते. शहरातील काही सुखसोयी आणि सुधारणा खेड्यात आल्या म्हणजे खेड्यांचे रुपांतर शहरात होते हे म्हणणे सर्वार्थाने खरे नाही. खेड्यातील शेती करणारा, छोटे-मोठे व्यवसाय करणारा ग्रामीण माणूस शहरात जाउन झोपडपट्टीत राहिला, कामगार-मजूर झाला किंवा सुशिक्षित होवून पांढरपेशा बनला तरी त्याची मानसिकता फारशी बदलत नाही. संख्येने मोठा असलेला, खेड्यातून रहाणारा, शहरात येवून उपऱ्यासारखे जीवन जगणारा सामान्य माणूस अखेरी शोषितच राहतो. म्हणून या ग्रामीण शोषित माणसाचे चित्रण करणारे ग्रामीण साहित्य या सर्व नवप्रवाहात अधिक समर्थ असण्याची गरज आहे. त्यातील सामर्थ्याला अधिक धार येण्याची गरज आहे.''[४]

१९७७ नंतर कथा, कादंबरी, कविता या ग्रामीण साहित्याची विस्तृत परंपरा आपल्याला आढळते. १९८५ ते २०१० या पंचवीस वर्षात ग्रामीण साहित्याची तिसरी-चौथी-पाचवी पिढी कार्यरत झालेली दिसते. भास्कर

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Vol.-VIII, Issue-II
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April-June 2021

चंदनशीव, प्रतिमा इंगोले, सदानंद देशमुख, बाबाराव मुसळे, श्रीराम गुंदकर, योगीराज वाघमारे यासारखे नव्या दमाचे साहित्यिक कथेच्या प्रांतात काम करु लागले. ग्रामीण साहित्यामधील प्रादेशिकता या साहित्यिकांनी खास करुन अधोरेखित केली. खान्देश, मराठवाडा, विदर्भ, कोकण, माणदेश या महाराष्ट्राच्या खोलवर पसरलेल्या आणि स्वतःची वैशिष्ट्ये असणाऱ्या प्रांताला ग्रामीण साहित्यिकांनी आपल्या साहित्यात विशेष स्थान दिले. भास्कर चंदनशीव यांची कथा चिंतनशील आहे तर प्रतिमा इंगोले यांच्या कथेत विदर्भातील स्त्रियांचे वर्णन केलेले आढळते. वास्तवदर्शी शिक्षण हे बाबा मुसळे यांच्या कथेचे वैशिष्ट्य सांगता येईल. ठिकठिकाणच्या बोलीभाषेचा अवलंब ग्रामीण साहित्यात झालेला दिसून येतो. राजन गवस, विश्वास पाटील, बाबाराव मुसळे, सदानंद देशमुख, वासुदेव मुलाटे, रंगनाथ पाठारे, यासारखे कादंबरीकार ही आपल्या साहित्याने ग्रामीण साहित्याचे प्रांगण फुलविताना दिसतात. राजन गवस यांची 'तणकट' तर सदानंद देशमुख यांची 'बारोमास', विश्वास पाटील यांची 'झाडाझडती' या कादंबऱ्यामधील ग्रामीण जीवनाचे वास्तवदर्शी चित्रण साहित्य अकादमीने पारीतोषिक मिळविणारे ठरले आहे.

ग्रामीण साहित्य चळवळीमुळे कथा आणि कादंबरी याप्रमाणे ग्रामीण कविता देखील दर्जेदार पद्धतीने निर्माण झाली. अगदी प्रारंभी बहिणाबाई चौधरी यांनी मोठ्या प्रमाणावर अस्सल ग्रामीणता आपल्या काव्याद्वारे मांडलेली दिसते. त्यानंतरच्या काळात आनंद यादव, विठ्ठल वाघ, ना.धो.महानोर या कविंनी देखील विपुल संख्येने ग्रामीण कविता लिहिलेली दिसते. नंतरच्या पिढीमध्ये इंद्रजित भालेराव, सदानंद देशमुख, नारायण सुमंत, शंकर वाडेवाल यासारखे कवीही ग्रामीण जीवन आपल्या कवितेमध्ये मांडताना दिसतात.

या संदर्भात अभ्यासक डॉ. आनंद यादव म्हणतात, ''मराठी साहित्यनिर्मितीचे केंद्रच आज सरकत आहे असे दिसते. आजवर साहित्यनिर्मिती प्रामुख्याने होत असलेल्या पुण्या-मुंबईसारख्या शहरांबाहेरच्या मनात, जीवनात ते स्थिर होऊ पाहत आहे. मराठी साहित्यालाच हा प्रचंड हादरा बसत आहे. पुढच्या काही वर्षात त्याची तीव्रता विशेष जाणवेल असे वाटते. कारण लोकशाहीत राजसत्ता, अर्थसत्ता, ज्ञानसत्ता यांचे जे स्थित्यंतर व हस्तांतर झाले त्याचे परिणाम किंवा ही खांदेपालट समाजाच्या सर्व अंगोपांगात हळूहळू होत जाणे नैसर्गिक आणि म्हणून अपरिहार्य आहे. साहित्यासारखी सांस्कृतिक बाब, अनुभवनिष्ठ घटना मनजागृत मानवी मनाशीच निगडित असल्याने, जोपर्यंत त्या मनावर त्या दिशेने पुरेसे संस्कार होत नाहीत तोवर ती मंद गतीनेच पुढे सरकरणार. इतर स्थित्यंतरांसारखी ती झटपट होऊ शकणार नाही. कारण ती सूक्ष्म तरल आहे. प्राणतत्त्वासारखी ती आहे. ती उसनी घेऊन किंवा अनुकरणाने निर्माण करता येण्यासारखी नाही, प्रत्यक्ष जगण्याशी तिचा संबंध आहे. म्हणून आणखी एखादी पिढी जावी लागेल असे वाटते.''[५]

RESEARCH JOURNEY

ग्रामीण साहित्य चळवळीचा धांडोळा घेताना अनेक विषयावर परिसंवाद आणि चर्चासत्र झालेली दिसतात. या परिसंवादामुळे नव्या दमाने लिहिणाऱ्या लेखकांना मार्गदर्शन झाले. सामाजिक प्रश्नांचा उहापोह ठिकठिकाणी भरलेल्या साहित्य संमेलनामधून केला गेला. पूर्वापार चालत आलेल्या प्रश्नाचे बदललेले स्वरुप आणि नव्यानेच निर्माण झालेले प्रश्न याचाही उपयोग ग्रामीण साहित्य निर्मितीत कसा होतो हे या चळवळीच्या माध्यमातून लक्षात येऊ लागले. ग्रामीण साहित्य हे अत्यंत महत्त्वाचे असून त्याचा स्वतःचा एक वेगळा प्रवाह निर्माण झालेला आहे हे या चळवळीमधून ग्रामीण साहित्यिकांनी सिद्ध करुन दिले.

अर्थात असे असले तरी प्रल्हाद लुलेकर म्हणतात तेही लक्षात घ्यावे लागेल. ते म्हणतात, ''मराठी भाषा आणि साहित्य मरणार नाही आणि संस्कृती संपणार नाही हे खरे आहे पण त्यांच्या संवर्धनाचे काय? हा प्रश्न विचारात घेतला पाहिजे. जागतिकीकरणाच्या मोठ्या वर्तुळात हे वर्तुळ लयास जाण्याची भीती आहे. त्यासाठी जागरुक राहून धोरणकार्य आणि कार्यदिशा ठरवाव्या लागतील. हे धोरण ठरविताना महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागात बोलल्या जाणाऱ्या बोलींना मूळचा जिवंतपणा राहील असे पाहावे लागेल. म्हणूनच मराठी भाषा आणि साहित्यासाठी एक वैचारिक भूमिका घेण्याची, त्यानुसार धोरण ठरविण्याची गरज निर्माण झाली आहे. ज्ञानसंस्कृतीच्या बाबतीत तडजोडनाही ही भूमिका आत्ता आणि आत्ताच घेण्याची गरज आहे.''[६]

ग्रामीण जाणिवांवर प्रेम करणाऱ्या सर्व ग्रामीण साहित्यिकांनी या ठिकठिकाणी भरणाऱ्या संमेलनांमध्ये भाग घेऊन ग्रामीण साहित्य चळवळीला आधार दिला, हीच गोष्ट सांस्कृतिक चळवळ निर्माण होण्यामागे, कारणीभूत ठरलेली दिसते. खेड्यात राहणारा मोठ्या संख्येतील समाज संस्कृतीचे एक वेगळे दर्शन घडविताना दिसते.

लोकसाहित्याचे जतन करतो, सणावाराचे महत्त्व जपून ठेवतो. पशुपक्ष्याची पूजा करतो. या सर्व संस्कृतीत मोडणाऱ्या गोष्टी ग्रामीण साहित्य संमेलनांतून चर्चेद्वारे आणि प्रत्यक्ष कलेद्वारे मांडण्याचे मोठे काम या साहित्यिकांनी केलेले दिसते. संस्कृती आणि समाज याचे परस्पर संबंध हे या पार्श्वभूमीवर अधोरेखित होताना दिसतात.

संदर्भ : -

१. वासुदेव मुलाटे – साठोत्तरी मराठी वाङ्मयातील प्रवाह. पृ.७१
२. वासुदेव मुलाटे – साठोत्तरी मराठी वाङ्मयातील प्रवाह. पृ.७५
३. प्रल्हाद लुलेकर – साठोत्तरी मराठी वाङ्मयातील प्रवाह. पृ.८९
४. वासुदेव मुलाटे – साठोत्तरी मराठी वाङ्मयातील प्रवाह. पृ.८०
५. आनंद यादव – ग्रामीण साहित्य: स्वरुप आणि समस्या पृ.५५
६. प्रल्हाद लुलेकर – साठोत्तरी साहित्य प्रवाह. पृ.२६